**राज्यात राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- मबाआ-२०२३/प्र.क्र.५७/का.७**
नवीन प्रशासकीय इमारत,मंत्रालय,मुंबई.
**दिनांक:- २३ जून, २०२३.**

**संदर्भ:-** उपआयुक्त, (प्रशिक्षण), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. मगांप्रप्रस/स्वसंप्र/प्रस्ताव/२०२३-२४/७६, दि. २०.६.२०२३.

**प्रस्तावना:-**

मा.मंत्री, महिला व बाल विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५.६.२०२३ रोजी विभागाची आढावा बैठक घेण्यात आली होती. सदर आढाव्यादरम्यान मा. मंत्री महोदयांनी राज्यात महिला व मुलींच्या होणाऱ्या निघृण हत्या व हिंसाचार याबाबत चिंता व्यक्त केली होती. महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वात जास्त शहरीकरण झालेले राज्य आहे. तसेच बदलत्या काळानुसार महिलांच्या बदलेल्या समस्या व त्यावर कराव्या लागणाऱ्या उपाययोजना करण्याकरिता शासनस्तरावरून नियोजन करणे अत्यावश्यक बाब झालेली आहे. अलीकडील काळात महिला व मुलींवर होणारे क्रुर हिंसाचार व त्यातुन त्यांची केली जाणारी हत्या हे शासनासमोरील व समाजासमोरील आव्हान ठरत आहे. त्यास आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. शाळकरी व महाविद्यालयीन तरूण-तरुणी यांची जीवनशैली तंत्रज्ञानाने खुपच बदलली आहे व त्यातुन सा◌ामजिक समस्या निर्माण होत आहेत.

त्यानुसार या विभागामार्फत राज्यातील युवतींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे व त्यांचे समुपदेशन करण्यासारख्या उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे राज्यातील महिला व मुलींवर होणाऱ्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी राज्यात राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर कार्यक्रम आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या अधिपत्याखालील महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था या स्वायत्त संस्थेच्या माध्यमातून राबविण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

२. महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण या स्वायत्त संस्थेच्या माध्यमातून राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयुक्त, महिला व बाल विकास यांच्या स्तरावरून अव्यावसायीक तत्वावर शैक्षणिक संस्था/विद्यापिठे, स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी संघटना/गट इ. सोबत आवश्यकतेनुसार सामंजस्य करार करतील. यासाठी कोणताही आर्थिक मोबदला न देण्याच्या अटीवर खालीलप्रमाणे संस्थेची निवड करण्यात येत आहे. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी या संस्थेसोबत आवश्यक ते सामंजस्य करार करावेत.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्था | विद्यार्थी संघटना | स्वयंसेवी संस्था |
|---|---|---|---|
| १. | राज्यातील विद्यापिठे | विद्यार्थी निधी ट्रस्ट | भारतीय स्त्री शक्ती |

३. वरील प्रमाणे युवतींना स्वसरंक्षणाचे प्रशिक्षण देण्याचे नियोजन दोन टप्प्यात करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात दिले जाणारे समुपदेशन हे निवड झालेल्या संस्थेमार्फत पुर्णत: नि:शुल्क देण्यात येईल.त्यामुळे शासनावर कोणताही आर्थिक भार असणार नाही. तसेच दुसऱ्या टप्प्यात दिले जाणारे प्रशिक्षण व त्याचा सराव यासाठी राज्यातील सर्व ३५८ तालुक्यांमध्ये प्रत्येकी २० प्रशिक्षकांद्वारे १००० युवतींना परि.क्र. ५ प्रमाणे दोन दिवसीय प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**४. युवतींचे मनोबल उंचविण्यासाठी आयोजित करावयाच्या समुपदेशन सत्राचा तपशिल**

| अ.क्र | विषय | तज्ञ | कालावधी | सहभागी संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| **पहिला दिवस** | | | | | |
| १ | महिला व मुलींवरील हिंसाचार-संकल्पना व सद्यस्थिती | निवड झालेली स्वयंसेवी संस्था पुरविणार | सकाळी ११.०० ते १२.३० | १००० (प्रति तालुका) | ० |
| २ | तंत्रज्ञान व महिला व मुलींना असलेले धोके | सायबर सेल तज्ञ अधिकारी | सकाळी १२.३० ते १.३० | १००० (प्रति तालुका) | ० |

**५. स्वसंरक्षणाच्या प्रशिक्षणाचे वेळापत्रक**

| अ.क्र. | प्रशिक्षण सत्र | कालावधी | सहभागी युवतींची संख्या | प्रशिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|
| **दुसरा दिवस** | | | | |
| १ | स्वसंरक्षणाचे प्राथमिक प्रशिक्षण | सकाळी ९.०० ते ९.४५ | १००० | २० |
| **ब्रेक** | | | | |
| २ | आधुनिक प्रशिक्षण | सकाळी १०.०५ ते १०.५० | १००० | २० |
| **तिसरा दिवस** | | | | |
| १ | प्रात्यक्षिक सराव | सकाळी ९.०० ते ९.४५ | १००० | २० |
| **ब्रेक** | | | | |
| २ | प्रात्यक्षिक सराव | सकाळी १०.०५ ते १०.५० | १००० | २० |

६. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी त्यांच्या संबंधित जिल्हयात या अभियानातंर्गत युवतींना द्यावयाच्या स्वसंरक्षणाच्या प्रशिक्षणासाठी या क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्था, संघटना, ॲकडमी यांचेकडून प्रति प्रशिक्षक प्रति दिन रुपये ५००/- च्या मर्यादेत प्रचलित वित्तीय नियम /कार्यपध्दतीनुसार दरपत्रक मागवून कार्यवाही करावी. तसेच पात्र संस्था, संघटना, ॲकडमी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या प्रशिक्षकांना धनादेश, आरटीजीएस व इतर ऑनलाईन माध्यमाव्दारे मानधन अदा करावेत. तथापि,सदर प्रशिक्षकांना कोणत्याही परिस्थितीत रोखीने मानधन अदा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. परि. क्र. २ मध्ये निवड केलेल्या राज्यातील विद्यापीठे, संस्था व संघटना यांनी सदर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजन करण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. तसेच, सदर प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी युवतींचे मनोबल उंचविण्यासाठी तज्ञ समुपदेशक उपलब्ध करुन द्यावेत. त्यासाठी त्यांना कोणताही आर्थिक मोबदला देण्यात येणार नाही. या अटीवर आयुक्त, महिला व बाल विकास यांनी सदर संस्थेसोबत सामजस्य करार करावा.

८. प्रस्तुत प्रकरणी येणारा रू. रूपये ७१६००००/- (अक्षरी रुपये एकाहत्तर लाख आणि साठ हजार मात्र) इतका खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत असून सदर खर्च सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण , १०९-व्यवसायपुर्व प्रशिक्षण, (०१) (०१) महात्मा गांधी प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेचा विस्तार व विकास आणि सक्षमीकरण (कार्यक्रम) २२३५ A७३२ या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदींमधून भागविण्यात यावा. तरतूद वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येत आहेत.

९. उपरोक्त स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक सविस्तर मार्गदर्शक सुचना आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी तात्काळ निर्गमित करून कार्यक्रम राबविण्यासंदर्भात आवश्यक ते सनियंत्रण ठेवावे. तसेच कार्यक्रम राबविल्यानंतर त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास सत्वर सादर करावा.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२३०६२३११४९२२७१३० असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA T BHALWANE

Digitally signed by RAJENDRA T BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA T BHALWANE
Date: 2023.06.26 14:10:50 +05'30'

( रा.ता.भालवणे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१) राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद विधानसभा, विधान भवन, मुंबई.
५) सर्व संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६) मा. मुख्य सचिव.
७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव.
८) सर्व मंत्रालयीन विभाग,
९) राज्यातील सर्व विद्यापिठे.
१०) विद्यार्थी निधी ट्रस्ट.
११) भारतीय स्त्री शक्ती.
१२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
१३) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई.
१४) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.

१५) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई.
१६) महासंचालक, महिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई .
१९) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
२०) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई.
२१) सर्व विभागीय आयुक्त.
२२) सर्व जिल्हाधिकारी.
२३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२४) सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास) जिल्हा परिषद.
२५) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
२६) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)
२७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२८) निवड नस्ती.